महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

परिपत्रक क्रमांक: खर्चमे 1089/प्र.क्र.482/89/लेखापरिक्षा

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 2 फेब्रुवारी 1994

# परिपत्रक

शासकीय खर्चाच्या ताळमेळाची सध्याची पध्दत तपासून त्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी वरिष्ठ उपलेखापाल (लेखा) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने एका अभ्यास गटाची नियुक्ती केली होती. त्या अभ्यास गटाने केलेल्या शिफारशीवर विचार करुन शासन पुढील आदेश देत आहे:-

(1) प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयातील नियंत्रक अधिका-यांची अद्ययावत यादी दरवर्षी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रसिध्द करावी. (जोडपत्र-एक)

(2) महालेखापालांच्या कार्यालयातील लेखे जुलै अखेर पूर्ण केले जातात. त्यामुळे खर्चाच्या ताळमेळाचे काम त्या वर्षीचे लेखे पूर्ण होण्याच्या आधी पूर्ण करण्यात यावे. जर अपवादात्मक परिस्थितीत वरील मुदतीत ते पूर्ण करता आले नाहीत तर त्यानंतर डिसेंबर पूर्वी त्यातील दुरुस्त्या महालेखापालांच्या कार्यालयाच्या निदर्शनास आणून चुकीच्या नोंदी (नोट्स ऑफ एरर) महालेखापालांच्या कार्यालयाकडून मिळविण्यात याव्यात.

(3) प्रशासकीय विभागांनी संबंधित नियंत्रक अधिकारी खर्चमेळाचे काम नेमून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे करतात याची खात्री करुन घ्यावी. यासाठी विभागीय प्रधान सचिवांनी/सचिवांनी प्रत्येक तिमाहीला खर्चमेळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठका घ्याव्यात.

(4) खर्चमेळाचे काम करणा-या कर्मचा-यांना खर्चमेळाच्या कामात अडचण उद्‌भवल्यास महालेखापालांच्या संबंधित लेखा अधिका-यांना भेटून त्यांच्या शंका/अडचणी दूर करुन घ्याव्यात.

2. प्रशासकीय विभागांनी वरील सूचनांचे परिपालन त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख काटेकोरपणे पालन करतील याबाबत दक्ष असावे. वरील सूचनांच्या कार्यवाहीच्या प्रगतीचा प्रत्येक विभागाचा तिमाही एकत्रित अहवाल वित्त विभाग (लेखापरीक्षा कार्यासन) यांना सादर करण्यात यावा. वित्त विभागातील लेप कार्यासनामार्फत या परिपत्रकातील सूचनांच्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा दर तीन महिन्यांनी घेण्यात यावा व त्याबाबतचा अहवाल प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांना सादर करण्यात यावा.

3. त्याचप्रमाणे समितीने अशीही सूचना केली आहे की, समान योजनांसाठी एकच उपशीर्ष/गौणशीर्ष वापरण्यात येवून, उपशीर्ष/गौणशीर्ष कमी करता येतील किंवा कसे याबाबत सर्व विभागांनी त्यांच्यांशी संबंधित उपशीर्ष/गौणशीर्षाचे परीक्षण करुन त्याबाबतचे प्रस्ताव वित्त विभागाला सादर करावेत.

4. त्याचप्रमाणे लेख्यांच्या कार्यपध्दतीविषयीचे काही सूचनात्मक साहित्य महालेखापालांकडे उपलब्ध आहे (जसे सार्वजनिक बांधकाम विभाग, आंतर राज्य विधी लेखांकन इ.) ते उपलब्ध करुन घेण्याबाबत प्रशासकीय विभागांनी खर्चमेळाचे काम करणा-या कर्मचा-यांना सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य.ल. राजवाडे,
प्रधान सचिव (ले. व को.),
वित्त विभाग.

सहपत्र:- जोडपत्र-एक.

शासमु-राटा-विचि-एच-291(13,000+10-4-94)-1

प्रति

राज्यपाल यांचे सचिव,
मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखापरीक्षा)-एक, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-दोन, महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल (लेखापरीक्षा)-दोन, महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उप कोषागार अधिकारी,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई 400 614,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली 110 001,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयाच्या विविध प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील इतर सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांच्या अर्थ विभागांतील मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
वित्त विभागातील सर्व अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने (ग्रंथालयास 5 प्रती),
निवड नस्ती, लेखापरीक्षा.

* पत्राद्वारे.

## जोडपत्र-एक

खर्चमेळाच्या कामाकरिता नियंत्रक अधिका-यांची यादी तयार करण्याचा नमुना

प्रशासकीय विभागाचे नाव:-

| क्रमांक | प्रधानशिर्ष व गट क्रमांक | गौणशीर्ष | उपशीर्ष | नियंत्रक अधिका-याचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

तळटिप:- ज्या ठिकाणी एकच नियंत्रक अधिकारी लेखाशीर्षासंबंधात जबाबदार असेल तेव्हा- उपशीर्ष/गौणशीर्ष, यांचा तपशील देण्याची आवश्यकता नाही.

---